# वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थांचा आस्वाद मनापासून घ्यावा-शां. ब. मुजूमदार



अनिल नेने लिखित 'खावे त्याच्या देशा' आणि 'मनोगत' या पुस्तकांच्या दुसऱ्या आवृत्तीचे आणि ई-आवृत्तीचे प्रकाशन प्रसंगी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार आणि इतर मान्यवर.

● पुणे । प्रतिनिधी

विविध देशांना भेटी देताना त्या त्या भागातील वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थांचा आस्वाद मनापासून घेतला पाहिजे. त्यामुळे आपोआपच संस्कृतीची ओळख होत राहाते, असे जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी सांगितले.

बुकगंगा पब्लिकेशन्स तर्फे अनिल नेने लिखित 'खावे त्याच्या देशा' आणि 'मनोगत' या पुस्तकांच्या दुसऱ्या आवृत्तीचे आणि ई-आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी डॉ. वीणा देव, लेखक अनिल नेने, डॉ.आश्विनी नेने, विजय देव, बुकगंगाचे संस्थापक मंदार जोगळेकर आदी उपस्थित होते. नेने यांची नातवंडे लारा आणि थियो डॉड यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

नेने यांनी विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना आपल्यातील कवी मनाला जागा करून दिली. त्याचे रूपांतर, प्रतिबिंब मनोगत पुस्तकात उमटले आहे. त्यांच्या कविता या भावनाप्रधान आणि संवेदनशील आहेत, असे ते म्हणाले.